# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

*फोन नं.(०२०) २६०५०६४१* **ई-मेल आयडी :-** sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/खर्च प्रस्ताव/परिपत्रक/६६३१ /सन २०१७
दिनांक :- /०९/ २०१७
३/१०/२०१७

प्रति,

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**विषय :- प्राधिकरणाकडे मंजूर मर्यादेपेक्षा जास्तीचे खर्च मंजूरीकरीता प्राप्त प्रस्तावामध्ये आढळून येणा-या त्रृटींबाबत.........**

**संदर्भ** :- प्राधिकरणाचे जा.क्र.रासनिप्रा/नि.वा.ख.मर्या./मार्ग.सुचना/६७७५/२०१६, दि.१६.११.१६

उपरोक्त विषयाकडे आपले गांभीर्याने लक्ष वेधण्यात येत आहे.

२/- उपरोक्त विषयास अनुसरुन सर्व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना कळविण्यात येते की, राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीत नियुक्त निर्वाचन अधिकारी यांच्याकडून परिपत्रकीय सुचनेनुसार झालेल्या निवडणूक निधी खर्चाचे प्रस्ताव जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे सादर केले जातात. परिपत्रकीय सुचनेप्रमाणे कमाल मर्यादेच्या आतील निवडणूक निधीचे प्रस्तावांना जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी स्तरावर मान्यता दिली जाते तर कमाल मर्यादेच्या वरील प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेस सादर केले जातात.

आज अखेर पार पडलेल्या निवडणूकीतील मर्यादेवरील प्रस्तावांची प्राधिकरणस्तरावर छाननी करताना असे निदर्शनास आले की, बहुतांश प्रस्तावांमध्ये त्रृटी असतात. सदर प्रस्तावांची छाननी खरेतर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी स्तरावर होवून त्रृटीची पूर्तता संबंधित निर्वाचन अधिका-यांकडून करुन घेऊन परिपूर्ण प्रस्ताव प्राधिकरणास सादर करणे अपेक्षित व आवश्यक आहे. तथापि जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचेस्तरावर अशी छाननी न होताच त्रृटीसह प्रस्ताव जशे प्राप्त होतात तसेच सादर केले जातात. त्याचप्रमाणे जादा झालेल्या खर्चाचे संदर्भात कोणतेही अभिप्राय न नोंदविता अगर स्पष्टीकरण/समर्थन न करता प्रस्ताव सादर केले जातात. ही बाब प्रशासकीय दृष्टया अतिशय चुकीची असल्याचे यापूर्वी प्राधिकरणाने निदर्शनास आणून दिले असतानाही त्यामध्ये काही सुधारणा झालेचे दिसून येत नाही.

त्याअनुषंगाने प्राधिकरणास निधीचे प्रस्तावामध्ये आढळून येणाच्या सर्वसाधारणपणे आढळलेल्या त्रृटीची शिर्षकनिहाय तपशील/यादी सोबत जोडली आहे. त्याप्रमाणे निर्वाचन अधिकारी यांनी पूर्तता केली आहे काय ? याची

छाननी करुन त्या त्रृटींची पूर्तता करुनच वाढीव निधीचे प्रस्ताव प्राधिकरणास सादर करावेत. जेणे करुन याबाबत अनावश्यक पत्रव्यवहार कमी होऊन प्रस्तावांवर मुदतीत कार्यवाही केली जाईल.

तसेच कमाल मर्यादेच्या आतील निधी प्रस्तावांवर मान्यतेचे अधिकार त्या त्या प्रर्वगात संबंधित जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना आहेत. अशा प्रस्तावांची सुध्दा छाननी करताना सदरच्या त्रृटींच्या बाबींची पूर्तता करुन घेऊनच मान्यता देणे आवश्यक आहे. ही बाबही प्राधान्याने आपणास निदर्शनास आणून देण्यात येत आहे. याप्रमाणे आपणाकडून कार्यवाही होणे आवश्यक आहे. सदर प्रमाणे कार्यवाही न झाल्यास त्याचे उत्तरदायीत्व हे संबंधित जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांची राहिल याची वेळीच नोंद घ्यावी.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने**

Giri
०३।१२।१८

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

**राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरणाकडे मंजूर मर्यादेपेक्षा जास्तीचे खर्च मंजूरीकरीता प्राप्त प्रस्तावामध्ये आढळून येणा-या त्रुटींचा तपशील**

| अ.क्र. | तपशिल | आढळून येणा-या त्रुटींचा तपशील |
|---|---|---|
| १ | **मतपत्रिका छपाई -**<br>I. सर्वसाधारण<br>ii. महिला<br>iii.अ.जा./अ.ज.<br>iv. इमाव<br>v.वि.जा./भ.ज./वि.मा.प्र. | • दि.१६/११/२०१६ चे परिपत्रकीय सूचनेपेक्षा जास्तीचे दराने मतपत्रिकांची छपाई करण्यात येते.<br>• जिल्हाधिकारी यांचे दरसूचीचा विचार करण्यात येत नाही / निवीदा काढण्यात येत नाहीत.<br>• एकूण मतदारांचे संख्येच्या १०% पेक्षा जास्त मतपत्रिकांची छपाई करण्यात येते.<br>• देयकामध्ये मतदारसंघ निहाय छपाईचे दर व मतपत्रिकांची संख्या नमूद करण्यात येत नाही.<br>• एकूण मतदारांची संख्या नमूद करण्यात येत नाही.<br>• देयकांच्या रकमा रेखांकीत धनादेशाने अदा करण्यात येत नाहीत.<br>• देयक साक्षांकीत करून जोडण्यात येत नाही. |
| २. | मतपेटी खरेदी / भाडयाने घेणे (संख्या) | • आवश्यकतेपेक्षा जास्त मतपेटयांची खरेदी / भाडयाने घेण्यात येतात.<br>• जिल्हाधिकारी यांचे दरसूचीचा विचार करण्यात येत नाही / निवीदा काढण्यात येत नाहीत.<br>• अनुज्ञेय दरापेक्षा जास्त दराने खरेदी करण्यात येते / भाडे अदा करण्यात येते.<br>• पुरवठाराचे अधिकृत देयक सादर करण्यात येत नाही / साक्षांकीत करण्यात येत नाही.<br>• देयकांच्या रकमा रेखांकीत धनादेशाने अदा करण्यात येत नाहीत. |
| ३ | प्रत्यक्ष मतदान केंद्रांवर लागणारी स्टेशनरी उदा. बाणफुलीचे शिक्के, कुलुप, लाख, लिफाफे, इंकपॅड, शाई, मतदान कक्ष साहित्य, इ. | • जिल्हाधिकारी यांचे दरसूचीचा विचार करण्यात येत नाही / निवीदा काढण्यात येत नाहीत.<br>• देयकांच्या रकमा रेखांकीत धनादेशाने अदा करण्यात येत नाहीत.<br>• आवश्यकतेपेक्षा जास्त साहित्याची खरेदी करण्यात येते.<br>• अनुज्ञेय दरापेक्षा जास्त दराने खरेदी करण्यात येते.<br>• देयक सादर करण्यात येत नाही / साक्षांकीत करण्यात येत नाही.<br>• पुनर्वापरायोग्य साहित्यांचा वापर मतमोजणीचे वेळी करण्यात येत नाही. |
| ४. | बुथ संख्या वाहन संख्या व वाहन खर्च | • जिल्हाधिकारी यांचे दरसूचीचा विचार करण्यात येत नाही / निवीदा काढण्यात येत नाहीत.<br>• वाहनांची आवश्यकता विचारात न घेता वाहनांचा वापर करण्यात येतो.<br>• अनुज्ञेय दरापेक्षा जास्तीचे दराने वाहनांची देयके अदा करण्यात येतात.<br>• अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त दराने खर्च झालेला असल्यास त्याबाबतची कारणमिमांसा / स्पष्टीकरण करण्यात येत नाही.<br>• देयके सादर करण्यात येत नाही / साक्षांकीत करण्यात येत नाहीत.<br>• देयकांच्या रकमा रेखांकीत धनादेशाने अदा करण्यात येत नाहीत. |
| ५ | मतदान केंद्र भाडे | • मतदान केंद्र भाडयाने घेताना किमान दराचा विचार केल्याचे दिसून येत नाही.<br>• मतदान केंद्राकरीता रकमा अदा केल्याचे देयक सादर केले जात नाही.<br>• देयक सादर केलेले असल्यास ते साक्षांकीत करण्यात येत नाही. |
| ६. | मतदान केंद्र वीज / पाणी / जनरेटर / बल्ब इं *(जनरेटर चा वाहतूक खर्चासह)* | • सविस्तर तपशील नमूद करण्यात येत नाही.<br>• देयके सादर केली जात नाहीत / सादर केलेल्या देयकांना साक्षांकीत करण्यात येत नाही.<br>• मर्यादेपेक्षा जास्तीचे दराने खर्च अदा करण्यात येतात.<br>• असे खर्च करण्यापूर्वी आवश्यकता विचारात घेण्यात येत नाही. |
| ७. | मतदान केंद्र कर्मचारी जेवण, चहा नाष्टा. | • अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त मतदान कर्मचारी नेमण्यात येतात.<br>• अनुज्ञेय दरापेक्षा जास्त दराने मानधन अदा करण्यात येते.<br>• जेवण, चहा व नाष्टा दिलेला नसल्यास त्याबाबतचा भत्ता अदा केल्याबाबतचे साक्षांकीत भत्तेशीट सादर करण्यात येत नाही. |
| ८. | मतदान केंद्र कर्मचारी मानधन | • मतदान केंद्रांची संख्या ऐनवेळी बदलणार नाही याबाबतची दक्षता न घेता जास्तीचे |

| | | |
|---|---|---|
| | (संख्या),मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, व शिपाई | कर्मचारी नेमण्यात येतात.<br>• अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त मतदान कर्मचारी नेमण्यात येतात.<br>• अनुज्ञेय दरापेक्षा जास्त दराने मानधन अदा करण्यात येते.<br>• मानधन अदा केल्याबाबतचे साक्षांकीत भत्तेशीट सादर करण्यात येत नाही. |
| ९. | मतमोजणी वेळी लागणारे साहित्य - | • अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त साहित्यांची / रकमेच्या साहित्याची खरेदी करण्यात येते.<br>• साहित्याचा तपशील नमूद करण्यात येत नाही.<br>• देयक साक्षांकीत करून सादर करण्यात येत नाही / देयक जोडण्यात येत नाही.<br>• काही प्रकरणात सदरचा खर्च हा दुबार दाखविण्यात येतो.<br>• मंडप, गालीचे, स्पीकर, शामीयाना, कुलर्स, गादया, बॅरीकेटस व स्टेज याबाबींवर अनावश्यक खर्च करण्यात येतो. |
| १०. | मतमोजणी केंद्र भाडे - | • मतमोजणी केंद्राचे भाडे अदा केल्याबाबतचे देयक सादर करण्यात येत नाही.<br>• देयक सादर केलेले असल्यास ते साक्षांकीत करण्यात येत नाही. |
| ११. | मतमोजणीसाठी लागणारी स्टेशनरी - | • अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त साहित्यांची / रकमेच्या साहित्याची खरेदी करण्यात येते.<br>• साहित्याचा तपशील नमूद करण्यात येत नाही.<br>• देयक साक्षांकीत करून सादर करण्यात येत नाही / देयक जोडण्यात येत नाही.<br>• काही प्रकरणात सदरचा खर्च हा दुबार दाखविण्यात येतो. |
| १२. | मतमोजणी कर्मचारी जेवण, नाष्टा, चहा - | • अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त मतमोजणी कर्मचारी नेमण्यात येतात.<br>• अनुज्ञेय दरापेक्षा जास्त दराने मानधन अदा करण्यात येते.<br>• जेवण, चहा व नाष्टा दिलेला नसल्यास त्याबाबतचा भत्ता अदा केल्याबाबतचे साक्षांकीत भत्तेशीट सादर करण्यात येत नाही. |
| १३. | मतमोजणी कर्मचारी मानधन | • अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त मतमोजणी कर्मचारी नेमण्यात येतात.<br>• अनुज्ञेय दरापेक्षा जास्त दराने मानधन अदा करण्यात येते.<br>• मानधन अदा केल्याबाबतचे साक्षांकीत भत्तेशीट सादर करण्यात येत नाही. |
| १४. | मतदान व मतमोजणीचा पोलिस कर्मचारी मानधन | • गृह विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे पोलीस बंदोबस्ताची रक्कम अदा करणे आल्यावर पुन्हा पोलीस कर्मचा-यांना मानधन देण्याची आवश्यकता नाही.<br>• तथापी डयूटीवरील पोलीसांना अपवादात्मक परिस्थीतीमध्ये भत्ता अदा केलेला असल्यास त्याबाबतचे भत्ते शीट साक्षांकीत करून जोडण्यात येत नाही. |
| १५ | निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दी व जाहीरात खर्च | • शासन मान्य दरापेक्षा जास्त दराने जाहिरात देण्यात येते.<br>• अपवादात्मक प्रकरणात शासन मान्य दराने विहीत कालमर्यादेत जाहिरात प्रसिध्द करणे शक्य नसल्यामुळे नियमीत दराने अदा केले असल्यास त्याबाबतची कारणमिमांसा / समर्थन करण्याबाबतचे विवेचन सादर करण्यात येत नाही.<br>• दैनिकांचे देयक निर्वाचन अधिकारी यांनी साक्षांकीत केलेले नसते.<br>• सोबत जाहिरातीच्या कात्रणाची व देयकांची छायांकीत प्रत जोडण्यात येत नाही.<br>• निवडणूकीची जाहिरात दैनिकात देणे अपेक्षीत असताना ती साप्ताहिकामध्ये देण्यात येते.<br>• जाहिरात एजन्सीकडून शासन मान्य दराने जाहिरात देताना आकारण्यात आलेला प्रति सें.मी दर हा माहिती व जनसंपर्क विभागाच्या दैनिक व आवृत्तीनिहाय असणा-या मान्य दराप्रमाणे आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करण्यात येत नाही. |
| १६. | उमेदवारी अर्ज छपाई व त्यावेळी लागणारी स्टेशनरी खरेदी | • अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त साहित्यांची / रकमेच्या साहित्याची खरेदी करण्यात येते.<br>• साहित्याचा तपशील नमूद करण्यात येत नाही.<br>• देयक साक्षांकीत करून सादर करण्यात येत नाही / देयक जोडण्यात येत नाही.<br>• काही प्रकरणात सदरचा खर्च हा दुबार दाखविण्यात येतो. |
| १७. | जि स नि अ मानधन / ता स नि अ मानधन | • अनुज्ञेय रकमेपेक्षा जास्त दराने रकमा अदा करण्यात येतात.<br>• साक्षांकीत भत्तेशीट / चलन सादर करण्यात येत नाही. |

| | | |
|---|---|---|
| | | • याबाबत संस्था प्रकारनिहाय संस्था नफयात / तोटयात आहे काय या बाबीचा विचार करण्यात येत नाही.<br>• ग्रेड पे + मूळ वेतन याचा उल्लेख करण्यात येत नाही.<br>• तालुका सहकारी निवडणूक अधिका-यांना मानधन अदा केल्याचे भत्तेशीट सादर केले जात नाही.<br>• निवडणूक मतदानाने / बिनविरोध झाली याबाबी विचारात घेण्यात येत नाहीत. |
| १८. | निवडणूक निर्णय अधिकारी | • अनुज्ञेय रकमेपेक्षा जास्त दराने रकमा अदा करण्यात येतात.<br>• साक्षांकीत भत्तेशीट / चलन सादर करण्यात येत नाही.<br>• मूळ वेतन व ग्रेड पे याचा उल्लेख करण्यात येत नाही.<br>• संस्था नफयात आहे किंवा कसे याबाबतचा उल्लेख करण्यात येत नाही. |
| १९. | सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी | • प्राधीकरणाने सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नियुक्तीस पूर्वमंजूरी दिलेली नसतानाही सदरचे खर्च करण्यात येतात.<br>• नियुक्तीस मान्यता दिलेली असल्यास त्याबाबतचे आदेशाची छायांकीत प्रत सादर करावी.<br>• साक्षांकीत भत्तेशीट सादर करण्यात येत नाही.<br>• अनुज्ञेय दरापेक्षा जास्तीचे दराने रकमा अदा करण्यात येतात.<br>• मूळ वेतन व ग्रेड पे याचा उल्लेख करण्यात येत नाही. |
| २०. | व्हिडीओ पथक खर्च - | • साक्षांकीत देयक सादर करण्यात येत नाही.<br>• व्हिडीओ वापराबाबत जि स नि अ / ता स नि अ यांची पूर्वमान्यता घेण्यात येत नाही / याबाबतचा कोणताही उल्लेख करण्यात येत नाही.<br>• अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त खर्च करण्यात येतो. जास्तीच्या खर्चाबाबत कोणतेही समर्थन / विवेचन सादर करण्यात येत नाही.<br>• आवश्यकतेप्रमाणे पूर्वमान्यतेने संवेदनशील प्रकरणातच व्हिडीओ शुटींग करण्याची आवश्यकता असताना सरसकट व्हिडीओ शुटींग करण्यात येते. |
| २१. | जिल्हा व तालुका निवडणूक नियंत्रण कक्ष - | • साक्षांकीत भत्तेशीट सादर करण्यात येत नाही.<br>• अनुज्ञेय संख्या विचारात न घेता कर्मचारी नेमण्यात येतात.<br>• अनुज्ञेय दरापेक्षा जास्तीचे दराने रकमा अदा करण्यात येतात. |
| २२. | अंतिम मतदार यादी छपाई खर्च - | • अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त खर्च करण्यात येतो.<br>• आवश्यकतेपेक्षा जास्त प्रती छापण्यात येतात. त्यामुळे खर्चामध्ये वाढ होते.<br>• छापण्यात आलेल्या प्रती व प्रती पृष्ठ / प्रत खर्च नमूद करण्यात येत नाही. |
| २३. | निवडणूक निरिक्षक व क्षेत्रिय अधिकारी यांचे मानधन व भत्ते - | • प्राधीकरणाने निवडणूक निरिक्षक व क्षेत्रिय अधिकारी यांचे नियुक्तीस पूर्वमंजूरी दिलेली नसतानाही सदरचे खर्च करण्यात येतात.<br>• नियुक्तीस मान्यता दिलेली असल्यास त्याबाबतचे पत्राची छायांकीत प्रत सादर करावी.<br>• साक्षांकीत भत्तेशीट सादर करण्यात येत नाही.<br>• अनुज्ञेय दरापेक्षा जास्तीचे दराने रकमा अदा करण्यात येतात. |
| २४. | मतमोजणी कर्मचारी प्रशिक्षण खर्च - | • निवडणूक नियम व प्राधीकरणाच्या परिपत्रकानुसार निर्वाचन अधिका-यांना संपूर्ण निवडणूक प्रक्रियेसाठी मानधन निश्चीत करून दिलेले असताना निर्वाचन अधिका-यांनी निवडणूक कर्मचा-यांचे प्रशिक्षण दिल्यास असे प्रशिक्षण घेतल्याबाबतचे निर्वाचन अधिका-यांचे भत्ता मिळणेबाबतचे देयक सादर करण्यात येत आहेत.<br>• साक्षांकीत भत्तेशीट सादर करण्यात येत नाही.<br>• अनुज्ञेय संख्या विचारात न घेता मतमोजणी कर्मचारी यांना नेमण्यात येते आणि प्रशिक्षणावर खर्च करण्यात येतो.<br>• अनुज्ञेय दरापेक्षा जास्तीचे दराने रकमा अदा करण्यात येतात. |

| | | |
|---|---|---|
| २५. | पदाधिकारी निवडणूक अध्यासी अधिकारी मानधन | • अनुज्ञेय रकमांपेक्षा जास्त रकमा अदा करण्यात येतात.<br>• साक्षांकीत देयक सादर करण्यात येत नाही. |
| २६. | निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातील मदतनीस मानधन. | • साक्षांकीत भत्तेशीट सादर करण्यात येत नाही.<br>• त्यांनी केलेल्या कामकाजाचा गोषवारा नमूद करण्यात येत नाही. |
| २७. | अनुषंगिक किरकोळ खर्च (वाहन भाडे, झेरॉक्स, स्टेशनरी) | • सदर खर्चाचे स्वरुप उपरोक्त नमुद केलेल्या खर्चाहून भिन्न नसते.<br>• उक्त नमूद बाबींवर खर्च करून या शीर्षाखाली दुबार खर्च दाखविण्यात येतात.<br>• खर्चाचे साधार समर्थन नमूद करण्यात येत नाही.<br>• जि स नि अ / ता स नि अ कार्यालयामध्ये करण्यात आलेला स्टेशनरी खर्च समाविष्ट करण्यात येतो. |
| २८. | **सर्वसाधारण बाबी** - | • निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यापासून दोन महिन्यात खर्चाचे प्रस्ताव मंजूरीकरीता सादर करणेबाबत जिसनिअ कार्यालयाकडून पाठपुरावा करण्यात येत नाही.<br>• जसजसे वाढीव खर्चाचे प्रस्ताव प्राप्त होतात तसे ते प्राधीकरणास सादर न करता विलंबाने व मोठया संख्येने एकदाच सादर करण्यात येतात. मोठया संख्येमुळे त्यावर तात्काळ उचित कार्यवाही करणे शक्य होत नाही.<br>• प्रस्तावाची जिसनिअ यांचे कार्यालयाचे स्तरावरून छाननी करण्यात येत नाही.<br>• प्रस्तावासोबत विहीत नमुन्यातील माहिती सादर करण्यात येत नाही.<br>• प्रस्तावासोबत अन्य सहकारी संस्थांची देयके जोडण्यात येतात.<br>• जिल्हाधिकारी यांचे दरसूचीप्रमाणे दर निश्चीत करण्यात येत नाहीत.<br>• उमेदवार अनामत रकमा परत केल्याबाबतचा पुरावा सादर करण्यात येत नाही.<br>• उमेदवारांच्या जप्त अनामत रकमा प्राधीकरणाकडे जमा केल्याबाबत तपशील देत नाही.<br>• खरेदी करण्याकरीता निवीदा मागविण्यात येत नाहीत.<br>• देयकाच्या रकमा या रेखांकीत धनादेशाने अदा करण्यात येत नाहीत.<br>• प्रस्ताव विहीत मुदतीमध्ये मान्यतेकरीता सादर करण्यात येत नाहीत.<br>• खर्च जास्त होण्याबाबतची कारणमिमांसा / सविस्तर तपशील नमूद करण्यात येत नाही.<br>• जि स नि अ / ता स नि अ कार्यालयाने केलेल्या खर्चाबाबतची देयके साक्षांकीत करून प्रस्तावासोबत सादर करण्यात येत नाहीत. |

03/10/16

(यशवंत गिरी)

**सचिव**

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**

**महाराष्ट्र राज्य, पुणे.**